# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

सारथी

बालचित्रवाणी इमारत , गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

| Email ID : sarthipune@gmail.com | CIN- U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502 |
|---|---|---|---|

दिनांक:-

## "महाराजा सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत सन २०२४-२५" साठी रिक्त राहिलेल्या जागांसाठी जाहिरात

महाराष्ट्र राज्यातील अधिवासी असलेल्या "मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा" जातीतील गुणवंत मुला-मुलींना **"महाराजा सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत सन २०२४-२५"** करिता पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पीएच.डी.) विशेष अध्ययन करण्यासाठी रिक्त राहिलेल्या जागांसाठी विद्यार्थ्यांकडून शिष्यवृतीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीतील ज्या विद्यार्थ्यांनी सन **२०२४-२५** या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पीएच.डी) अभ्यासक्रमाकरिता QS (Quacquareli Symonds) World Ranking २०० च्या आत रॅन्कीग असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरिता नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५- अ दि. २० जुलै २०२३ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७/बांधकामे,दिनांक-२५ जुलै २०२४ नुसार सदर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत पात्र उमेदवाराकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी ऑनलाइन (Online) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.पहिल्या टप्प्यातील झालेल्या निवडी मधून शाखानिहाय रिक्त राहिलेल्या उर्वरित जागांसाठी विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे शाखानिहाय/अभ्यासक्रमनिहाय अर्ज करावेत. **सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:**

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | पदव्युतर पदवी/ पदविका रिक्त शिष्यवृत्ती संच | डॉक्टरेट (Ph.D) रिक्त शिष्यवृत्ती संच | एकूण रिक्त शिष्यवृत्ती संच |
|---|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी | ० | ४ | ४ |
| २ | वास्तूकलाशास्त्र | २ | २ | ४ |
| ३ | व्यवस्थापन | ० | १ | १ |
| ४ | विज्ञान | ० | ४ | ४ |
| ५ | वाणिज्य/ अर्थशास्त्र | १ | ५ | ६ |
| ६ | कला | २ | ५ | ७ |
| ७ | विधी अभ्यासक्रम | १ | १ | २ |
| ८ | औषध निर्माण शास्त्र | २ | १ | ३ |
| | **एकूण** | **८** | **२३** | **३१** |

- परदेशी विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेल्या पदवी परिक्षेत कमीकमी ५५% गूण मिळालेले असावेत.
- उमेदवार व उमेदवाराचे आई वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्यावत (सन २०२४) मधील **QS (Quacquarelli Symonds) World Ranking २००** च्या आत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्यांचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक (२०२३-२४) मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता मिळणारे लाभ व निवड पद्धत, सुधारित वेळापत्रक इत्यादी माहितीकरिता सारथी संस्थेचेसंकेतस्थळास **https://sarthi-maharashtragov.in/** वेळोवेळी भेट द्यावी.
- नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक सारथी २०२२ /प्र.क्र. २८९/का १४२५-अ दि. २० जुलै, २०२३ मधील परिशिष्ठ-अ व परिशिष्ठ- ब मध्ये नमूद बाबींनुसार, व शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७/बांधकामे,दिनांक-२५ जुलै २०२४ नुसार प्राप्त अर्जाबाबत मंजुरीची कार्यवाही करण्यात येईल.
- इच्छुक उमेदवारांनी **https://sarthi-maharashtragov.in/** या संकेतस्थळावर ऑनलाइन (Online) पद्धतीने अर्ज भरावा व ऑनलाइन (Online) भरलेल्या अर्जाची मूळ प्रत, प्रमाणपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रती पडताळणीसाठी, सारथी मुख्यालयास खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर ऑनलाइन (Online) पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे ऑनलाइन (Online) अर्जातसोबत अपलोड करणे. | दिनांक २५/१२/२०२४ ते ३०/०१ /२०२५ |
| २ | ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या स्वसाक्षांकीत प्रतीसह पडताळणीसाठी सारथी संस्थेच्या बालचित्रवाणी, सी टी सर्व्हे क्रमांक १७३, बी/१, गोपाळ गणेश आगरकर रोड, पुणे ४११००४,येथील मुख्य कार्यालयात सादर करावे. | दिनांक २५/१२/२०२४ ते ३१/०१/२०२५ व सदर कागदपत्रांचा संच मुळ कागदपत्रासह सामाजिक न्याय विभागातील अधिकारी कर्मचारी यांचे कडून तपासून घेवून दाखल करावा. |

- टीप:- ऑनलाइन (Online) स्वरूपातील अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने अर्ज सादर केल्यास तो अर्ज विचारात घेतला जाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी वरील नमूद कालावधीतच अर्ज दाखल करण्याची दक्षता घ्यावी.

श्री. अशोक काकडे (भा.प्र.से)
व्यवस्थापकीय संचालक,सारथी, पुणे